# जागतिक मिशन दिन २०२५साठी पोप फ्रान्सिस ह्यांचा संदेश

## ''सर्व लोकांमध्ये आशेचे मिशनरी''

प्रिय बंधू-भगिनींनो,

२०२५च्या ज्युबिली वर्षात जागतिक मिशन दिनासाठी महत्त्वाचा संदेश 'आशा' आहे. (बुल, *स्पेस नॉन कॉन्फुंदित* १). मी एक ब्रीदवाक्य निवडले आहे : ''सर्व लोकांमध्ये आशेचे मिशनरी.'' हे ब्रीदवाक्य ख्रिस्ती लोकांना आणि संपूर्ण चर्चला, बाप्तिस्मा घेतलेल्या समुदायाला, ख्रिस्ताच्या पावलावर चालण्यास संदेशवाहक आणि आशेचे निर्माते होण्याच्या आपल्या मूलभूत पाचारणाची आठवण करून देते. मला विश्वास आहे की विश्वसनीय परमेश्वराबरोबर हा कृपेचा काळ असेल, ज्याने आपल्याला पुनरुत्थित झालेल्या ख्रिस्तामध्ये ''जिंवत आशेने'' नवीन जन्म दिला आहे (१ पेत्र १:३-४). येथे मी आपल्या ख्रिस्ती मिशनरी अस्मितेच्या काही संबंधित पैलूंचा उल्लेख करू इच्छितो, जेणेकरून आपण देवाच्या आत्म्याद्वारे स्वत:ला मार्गदर्शन करू शकू आणि चर्चमध्ये नवीन सुवार्तेच्या काळासाठी पवित्र उत्साहाने पेटून उठू शकू. मिशनऱ्यांना जगात आशा पुनरुज्जीवित करण्यासाठी पाठवले जाते, ज्या जगावर गडद सावली पसरली आहे (*फ्रातेल्ली तुत्ती* ९-५५).

### १. आपली आशा असलेल्या ख्रिस्ताच्या पावलावर पाऊल ठेवत चालणे.

पवित्र वर्ष २००० नंतर तिसऱ्या सहस्त्रकाची पहिली सामान्य ज्युबिली साजरी करताना, आपण इतिहासाचा केंद्रबिंदू असलेल्या ख्रिस्तावर आपली नजर स्थिर ठेवतो, ''जो काल, आज आणि उद्या सारखाच आहे'' (इब्री १३:८). नाझरेथच्या सिनेगॉगमध्ये येशूने जाहीर केले की, इतिहासात ''आज'' त्याच्या उपस्थितीत पवित्रशास्त्र पूर्ण झाले आहे. अशा प्रकारे येशूने प्रकट केले की देवाच्या राज्याची सुवार्ता घोषित करण्यासाठी आणि सर्व मानवजातीसाठी ''परमेश्वराच्या कृपेच्या वर्षाची'' घोषणा करण्यासाठी पवित्र आत्म्याच्या अभिषेकासह पित्याने पाठवलेला तोच आहे (लुक ४:१६-२१).

जगाच्या शेवटापर्यंत टिकणाऱ्या ह्या गूढ ''आज''मध्ये, ख्रिस्त सर्वांसाठी तारणाची परिपूर्णता आहे आणि विशेषकरून ज्यांची एकमेव आशा परमेश्वर आहे त्यांच्यासाठी तो मार्ग आहे. आपल्या सार्वजनिक जीवनात, ''येशू सत्कर्मे करीत आणि सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वांना बरे करीत फिरला'' (प्रे.कृ.१०:३८) व त्याने गरजू आणि सर्व लोकांची देवावरील आशा दृढ केली. त्याने पाप वगळता आमच्या सर्व मानवी दुर्बलतेचा अनुभव घेतला, गेथशेमानी बागेमधील आणि क्रुसावरील वेदनांमध्ये निराशेला कारणीभूत ठरू शकणारे ते गंभीर क्षणदेखील त्याने अनुभवले. प्रभू येशूने पित्याच्या मानवतेसाठी असलेल्या तारणदायी योजनेवर आशेने भरलेल्या भविष्यासाठी ह्या शांततेच्या योजनेवर आज्ञाधारकपणे विश्वास ठेवला आणि सर्वकाही पित्याकडे सोपवून दिले (यिर्मया २९:११). अशा प्रकारे येशू आशेचा दिव्य मिशनरी बनला. शतकानुशतके जे अत्यंत कठीण परीक्षांमध्येही स्वत:चे देवाने दिलेले मिशन पार पाडतात त्यांचा तो सर्वोच्च आदर्श बनला.

आपल्या शिष्यांद्वारे ज्यांना सर्व लोकांकडे पाठवण्यात आले, त्यांच्याबरोबर गूढपणे प्रभू येशू मानवतेसाठी आशेची सेवा सुरू ठेवतो. प्रभू येशू अजूनही गरीब, दु:खी, निराश आणि शोषित असलेल्या सर्वांकडे प्रेमाने पाहातो आणि ''त्यांच्या जखमांवर सांत्वनाचा मलम आणि आशेचा द्राक्षारस ओततो'' (प्रस्तावना ''जीजस द गुड सॅमॅरीटन''). आपला प्रभू आणि गुरू ह्याच्याशी आज्ञाधारक राहून सेवेच्या भावनेने, चर्च, ख्रिस्ताच्या मिशनरी शिष्यांचा समुदाय, हे मिशन लांबवतात आणि अशाप्रकारे राष्ट्रांमध्ये सर्वांसाठी चर्च आपले जीवन अर्पण करते. छळ, क्लेश आणि अडचणी,

तसेच चर्चच्या सदस्यांच्या कमकुवतपणामुळे स्वत:च्या अपूर्णता आणि अपयशांना सामोरे जाताना, ख्रिस्ताच्या प्रेमाचे चर्च सतत आपल्या मिशनरी प्रवासात चिकाटीने, त्याच्याशी एकरूप होण्यासाठी आणि त्याच्याप्रमाणे आणि त्याच्याबरोबर, पीडित मानवतेची विनंती ऐकण्यास आणि खरोखरच निश्चित तारणाच्या प्रतिक्षेत असलेल्या प्रत्येक निर्मितीच्या कण्हण्याचा आवाज ऐकण्यास उत्सुक आहे. हे असे चर्च आहे ज्या चर्चला परमेश्वर नेहमी आणि सदैव त्याच्या पावलावर पाऊल ठेवून चालण्याचे आवाहन करतो : ''हे एक स्थिर चर्च नाही, तर एक मिशनरी चर्च आहे जे तिच्या प्रभूसह जगाच्या रस्त्यांवरून चालते'' (प्रवचन, बिशपांच्या सिनडच्या सर्वसाधारण महासभेचा समारोप समारंभ, २७ ऑक्टोबर २०२४).

आम्हालाही प्रभू येशूच्या पावलावर पाऊल ठेवून चालण्यास, त्याच्याबरोबर आणि त्याच्यामध्ये, देवाने आपल्याला जगण्यासाठी दिलेल्या प्रत्येक ठिकाणी आणि सर्व परिस्थितीत सर्वांसाठी आशेचे चिन्ह आणि संदेशवाहक बनण्याची प्रेरणा मिळो. ख्रिस्ताचे मिशनरी शिष्य म्हणून बाप्तिस्मा घेतलेले सर्वजण पृथ्वीच्या कानाकोपऱ्यात ख्रिस्ताची आशा प्रज्वलित करतील!

## २. ख्रिस्ती, सर्व लोकांमध्ये आशा आणणारे आणि आशेचे निर्माते

प्रभू ख्रिस्ताचे अनुसरण करताना, ख्रिस्ती लोकांना ज्यांना ते भेटतात त्यांच्या जीवनातील ठोस परिस्थितीशी जुळवून घेऊन त्यांना सुवार्ता घोषित करण्यास सांगितले जाते आणि अशा प्रकारे त्यांना आशा आणणारे आणि आशेचे निर्माते बनण्यासाठी बोलावले जाते. खरोखरच, ''आपल्या काळातील लोकांचे, विशेषत: गरीब किंवा दु:खी लोकांचे सुख आणि आशा, दु:ख आणि वेदना ख्रिस्ताच्या अनुयायांचे सुख आणि आशा, दु:ख आणि वेदना आहेत. जे अस्सल मानवी नसते त्याचा आपल्या हृदयात प्रतिध्वनी उमटणे केवळ अशक्य असते'' (*गाऊदियूम एत् स्पेस* १).

प्रत्येक युगातील ख्रिस्ती समुदायांना भावना आणि शैली व्यक्त करणारे द्वितीय व्हॅटिकन धर्मपरिषदेचे हे प्रसिद्ध विधान त्यांच्या सदस्यांना प्रेरणा देत आहे आणि त्यांना जगातील आपल्या बंधू-भगिनींबरोबर चालण्यास मदत करीत आहे. इथे मी विशेषत: तुमच्यापैकी जे मिशनरी *ad gentes* आहेत त्यांच्याबद्दल विचार करतो. परमेश्वराच्या हाकेचे अनुसरण करून, ख्रिस्तामधील देवाच्या प्रेमाची ओळख करून देण्यासाठी तुम्ही इतर राष्ट्रांमध्ये गेला आहात, त्याबद्दल मी तुमचे मन:पूर्वक आभार मानतो! तुमचे जीवन पुनरुत्थित झालेल्या ख्रिस्ताच्या आज्ञेला स्पष्ट प्रतिसाद आहे, ज्याने आपल्या शिष्यांना शुभवर्तमानाच्या प्रचारासाठी सर्व लोकांकडे पाठवले (मत्तय २८:१८-२०). अशा प्रकारे, तुम्ही आत्म्याच्या सामर्थ्याने आणि दैनंदिन प्रयत्नांनी बाप्तिस्मा घेतलेल्या लोकांच्या वैश्विक पाचारणाची चिन्हे आहात. तुम्ही सर्व लोकांमध्ये मिशनरी आणि प्रभू येशूने दिलेल्या महान आशेचे साक्षीदार व्हाल.

ह्या आशेचे क्षितिज ह्या जगाच्या लयास जात असलेल्या गोष्टींच्या पलीकडे जाऊन त्या दिव्य वास्तवाकडे उघडते ज्यात आपण आजही भागीदार आहोत. खरोखरच, जसे की संत पोप सहावे पॉल ह्यांनी पाहिले, ''ख्रिस्तामधील तारण, जे चर्च देवाच्या दयेची देणगी म्हणून सर्वांना देते, ते केवळ अपरिमित, भौतिक किंवा आध्यात्मिक गरजा पूर्ण करणे नाही...  तात्पुरत्या इच्छा, आशा, व्यवहार आणि संघर्षामध्ये पूर्णपणे अडकलेले आहे. त्याऐवजी सर्वसमर्थ परमेश्वराशी संवाद साधून परिपूर्णतेपर्यंत पोहोचण्यासाठी ते अशा सर्व मर्यादा ओलांडते. हे पारलौकिक आणि लौकिक अशा दोन्ही प्रकारचे तारण आहे. ज्याची सुरूवात खरोखरच ह्या जीवनात आहे; परंतु ती अनंतात पूर्ण होते.'' (*इव्हेंजेली नूनसियांडी* २७).

ह्या महान आशेने प्रेरित होऊन ख्रिस्ती समुदाय ह्या जगात एका नवीन मानवतेचे अग्रदूत बनू शकतात, जेथे जगाच्या सर्वात ''विकसित भागात, मानवी संकटांची गंभीर लक्षणे दिसून येतात: वृद्धांच्या गरजांबद्दल असलेला मोठा विस्कळीतपणा, एकटेपणा आणि उदासीनता, तसेच आपल्या गरजू शेजाऱ्यांना मदत करण्यास दाखवलेली उदासिनता. सर्वात तांत्रिकदृष्टया प्रगत राष्ट्रांमध्ये, ''जवळीकता'' नाहीशी होत आहे: आपण सर्व एकमेकांशी जोडलेले आहोत; परंतु संबंधित नाही. कार्यक्षमतेचे वेड व भौतिक गोष्टींबद्दलची आसक्ती आणि आपल्या महत्त्वाकांक्षा आपणांस आत्मकेंद्रित करीत आहेत आणि आपणांस परोपकार करण्यास अक्षम बनवत आहेत. समुदायाच्या जीवनात अनुभवलेले शुभवर्तमान आपल्याला संपूर्ण, निरोगी आणि मुक्त मानवतेकडे पुनर्स्थापित करू शकते.

ह्या कारणास्तव, मी पुन्हा एकदा आपल्या सर्वांना ज्युबिलीच्या 'बूल ऑफ इंडक्शन'मध्ये नमूद केलेली कामे पार पाडण्याचे आमंत्रण देतो (क्र. ७-१५). हे करीत असताना सर्वात गरीब आणि दुर्बल, आजारी वृद्ध व भौतिकवादी आणि उपभोगवादी समाजातून बहिष्कृत झालेल्यांकडे विशेष लक्ष द्यावे. हे देवाच्या ''शैलींसह करावे : जवळीकता, करूणा आणि कोमलतेने आपल्या बंधू-भगिनींशी त्यांच्या विशिष्ट परिस्थितीत वैयक्तिक संबंध विकसित करून हे करावे (*इवांजेली गाऊदियूम* १२७-१२८). अनेकदा तेच आपल्याला आशेने कसे जगावे हे शिकवतात. वैयक्तिक संपर्कातून आपण प्रभूच्या दयाळू अंत:करणाचे प्रेमही व्यक्त करू. ''ख्रिस्ताचे हृदय... शुभवर्तमानाच्या सुरूवातीच्या प्रचाराचा गाभा आहे'' (*दिलेक्सीत नोस* ३२). ह्या स्तोत्रातून आपल्याला देवाकडून मिळालेली आशा आपण साधेपणाने देऊ शकतो (१ पेत्र १:२१) आणि देवाने आपल्याला जे सांत्वन दिले आहे तेच सांत्वन आपण इतरांनाही देऊ शकता (२ करिंथ १:३-४). येशूच्या मानवी आणि दैवी हृदयात देवाला प्रत्येक पुरूष आणि स्त्रीच्या हृदयाशी बोलायचे आहे आणि आपल्या सर्वांना त्याच्या प्रेमाकडे आकर्षित करायचे आहे. ''आम्हाला हे मिशन चालू ठेवण्यासाठी पाठवण्यात आले आहे. ख्रिस्ताच्या हृदयाची आणि पित्याच्या प्रेमाची चिन्हे बनून संपूर्ण जगाला आलिंगन देण्यासाठी हे मिशन आहे'' (पॉन्टिफिकल मिशन सोसायटीजच्या सर्वसाधारण सभेमध्ये, ३ जून २०२३).

## ३. आशेच्या मिशनचे नूतनीकरण

आज आशेच्या मिशनच्या निकडीला सामोरे जाताना, ख्रिस्ताच्या शिष्यांना आशेचे ''कारागीर'' कसे व्हावे आणि बऱ्याचदा विचलित आणि दु:खी मानवतेचे पुनरुज्जीवन कसे करावे हे शोधण्यासाठी प्रथम बोलावले जाते.

ह्याकरिता, आपल्याला प्रत्येक ख्रिस्ती उपासनेत आणि विशेषत: उपासना वर्षाचे केंद्र आणि परिपाक असलेल्या 'ईस्टर ट्रिड्यूम'दरम्यान अनुभवल्या जाणाऱ्या आध्यात्मिकतेचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. ख्रिस्ताच्या तारणदायी मृत्यूत आणि पुनरुत्थानात परमेश्वराच्या वल्हांडणात, जे इतिहासाच्या शाश्वत वसंत ऋतुचे प्रतीक आहे, आपण बाप्तिस्मा घेतला आहे, परिणामी आम्ही ''वसंत ऋतुचे लोक'' (springtime people) आहोत. जे सर्वांबरोबर वाटून घेण्याच्या आशेने भरलेले आहोत, कारण ख्रिस्तामध्ये ''मृत्यू आणि द्वेष हा अंतिम शब्द नाही'' असा आम्ही विश्वास ठेवतो आणि ते जाणतो (कॅटेकिसिस, २३ ऑगस्ट २०१७). उपासना उत्सवांमध्ये आणि साक्रामेंतामध्ये सादर केलेल्या पास्का रहस्यांमधून शुभवर्तमानाच्या जागतिक प्रचाराच्या विशाल क्षेत्रात उत्साहाने, निर्धाराने आणि संयमाने कार्य करण्यासाठी आपण पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याचा सतत वेध घेतो. ''ख्रिस्त मरणातून उठलेला आणि गौरविलेला, आमच्या आशेचा झरा आहे आणि त्याने आपल्यावर सोपवलेले मिशन पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या मदतीपासून तो आपल्याला वंचित ठेवणार नाही''

(*इवांजेली गाऊदियूम* २७५). ख्रिस्तामध्ये आपण त्या पवित्र आशेवर जगतो आणि त्याची साक्ष देतो, जी ''देवाची देणगी आहे आणि ख्रिस्ती लोकांसाठी एक मिशन कार्य आहे (होप इज अ लाईट इन द नाईट, व्हॅटीकन सिटी, २०२४, ७).

आशेचे मिशनरी हे प्रार्थनेचे पुरूष आणि स्त्रिया आहेत, कारण  आदरणीय कार्डिनल फ्रान्सिस झेवियर व्हॅन थुआन ह्यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास,''आशा धरणारी व्यक्ती प्रार्थना करणारी व्यक्ती आहे.'' कार्डिनल स्वत: विश्वासार्ह प्रार्थना आणि मिस्साबलिदान ह्यांमधून मिळालेल्या सामर्थ्यामुळे आपल्या प्रदीर्घ तुरूंगवासात आशेवर टिकून राहिले होते. (द रोड ऑफ होप, बॉस्टन, २००१,९६३). प्रार्थना ही प्राथमिक मिशनरी क्रिया आहे आणि त्याचवेळी ''आशेची पहिली शक्ती'' आहे, हे आपण विसरता कामा नये (कॅटेकेसिस, २० मे २०२०).

म्हणून आपण प्रार्थनेपासून सुरूवात करून, विशेषत: देवाच्या वचनांवर आणि स्तोत्रांवर (ज्याचा रचनाकार पवित्र आत्मा आहे) आधारित प्रार्थनेपासून आशेच्या मिशनचे नूतनीकरण करू या (कॅटेकेसिस, १९ जून २०२४).  स्तोत्रे आपल्याला प्रतिकूल परिस्थितीत आशा बाळगण्यास, आपल्या सभोवतालच्या आशेची चिन्हे ओळखण्यास आणि सर्व लोकांकडून देवाची स्तुती व्हावी अशी सतत ''मिशनरी'' इच्छा बाळगण्यास शिकवतात (स्तोत्र ४१:१२; ६७:४). प्रार्थना करून आपण देवाने प्रज्वलित केलेली आशेची ज्योत आपल्यामध्ये जिवंत ठेवतो. जेणेकरून ती ज्योत एक मोठी अग्नी बनू शकेल. जी आपल्या सभोवतालच्या प्रत्येकाला प्रकाशमान आणि उबदार करील, तसेच प्रार्थनेनेच प्रेरणा देणाऱ्या ठोस कृती आणि हावभावांद्वारे आपण आपले जीवन उजळू शकतो.

शेवटी, ख्रिस्ती आशेप्रमाणेच शुभवर्तमानाचा प्रचार ही नेहमीच एक सामुदायिक प्रक्रिया आहे (बेनेडिक्ट सोळावे, *स्पे सालवी,* १४). ही प्रक्रिया शुभवर्तमानाच्या सुरुवातीच्या प्रचाराने आणि बाप्तिम्याने संपत नाही, तर शुभवर्तमानाच्या मार्गावर बाप्तिस्मा घेतलेल्या प्रत्येकाच्या संगतीद्वारे ख्रिस्ती समुदायांच्या उभारणीसह सुरू राहते. आधुनिक समाजात, चर्चमधील सदस्यत्व कधीही एकदाच साध्य केले जात नाही. म्हणूनच ख्रिस्तावरील प्रगल्भ विश्वास सुपूर्त करण्याची आणि त्या विश्वासाला आकार देण्याची मिशनरी क्रिया ''चर्चच्या सर्व कार्यासाठी अनुरूप'' आहे (*इवांजेली गाऊदियूम,* १५). एक असे कार्य ज्यासाठी प्रार्थना आणि कृती ह्यांचा समन्वय आवश्यक आहे. येथे मी पुन्हा एकदा चर्चच्या ह्या मिशनरी सिनोडॅलीटीचे महत्त्व अधोरेखित करतो, तसेच बाप्तिस्मा घेतलेल्या लोकांच्या मिशनरी जबाबदारीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवीन विशिष्ट चर्चेसना पाठिंबा देण्यासाठी पॉन्टिफिकल मिशन सोसायटीने केलेल्या सेवेवर मी जोर देईन. मी तुम्हा सर्वांना, मुलांना, तरूणांना, प्रौढांना आणि वृद्धांना आवाहन करतो की, तुम्ही तुमच्या जीवनाने आणि प्रार्थनेच्या साक्षीने, आपल्या बलिदानाने आणि आपल्या उदारतेने चर्चच्या सुवार्ता प्रचार कार्यात सक्रियपणे सहभागी व्हा. त्याबद्दल धन्यवाद!

प्रिय भगिनींनो आणि बंधूनो, आपण आपली आशा, येशू ख्रिस्त, ह्याची आई मरिया हिच्याकडे वळू या. ह्या ज्युबिली निमित्त आणि पुढील वर्षांसाठी आमची प्रार्थना आम्ही मरियेकडे सोपवतो: ''परमेश्वराच्या प्रेमाचा संदेश सर्वांना देताना ख्रिस्ती आशेचा प्रकाश प्रत्येक स्त्री-पुरूषाला प्रकाशित करो आणि जगाच्या कानाकोपऱ्यात चर्च ह्या संदेशाची विश्वासू साक्ष देवो'' (बुल, *स्पेस नॉन कॉन्फुंदित* ६).

*रोम, सेंट जॉन लॅटरन, २५ जानेवारी २०२५, संत पौल, प्रेषित, ह्याच्या परिवर्तनाचा सण.*

**+ पोप फ्रान्सिस**